 सं.फौ.ख.क्र. ३३७ /२०२६

## – आदेश –

१. आरोपी महेश शंकर कठोले --- जि.नागपूर याची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ प्रमाणे महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२–अ या गुन्हयासाठी दोषी ठरविण्यात येऊन रुपये ३००/– (रुपये तीनशे मात्र) द्रव्य दंड व न्यायालय उठेपावेतो न्यायालयात बसुन राहण्याची शिक्षा ठोठावण्यात येते. आरोपीने द्रव्यदंडाची रक्कम न भरल्यास त्याने ०१ दिवस साध्या कारावासाची शिक्षा भोगावी.

२. सदर प्रकरणातील जप्त मुद्येमाल रोख रक्कम सरकारजमा करण्यात यावी व उर्वरीत मुद्येमाल मुल्यहीन असल्याने नष्ट करण्यात यावा.

14.03.26

(पी. के. मुटकुळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कुही, जी.नागपूर.

दि. १४.०३.२०२६

Fine paid of Rs. 300/-
vide R.No 93/26
Dt: 14/3/26

14/3/26
Nazir
Civil and Criminal Court
Kuhi

 संं.फौ.ख.क्र. 337/२०२६

**आरोपीचे निवेदन –**

| | | |
|---|---|---|
| प्रश्न १ | | तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या काय ? |
| उत्तर | | होय. |
| प्रश्न २ | | तुम्हाला वाचुन व समजावुन सांगितलेला आरोप समजला काय ? |
| उत्तर | | होय. |
| प्रश्न ३ | | तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ? |
| उत्तर | | होय, आम्हाला गुन्हा कबुल आहे. |

महेश शंकर कनोते

आरोपीची सही/अंगठा

(पी. के. मुटकुळे)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

कुही, जि.नागपूर.

दि. १४.०३.२०२६

**न्यायनिर्णय**

आरोपीने त्याला प्रस्तुत गुन्हा मान्य व कबूल असल्याचे कथन केलेले आहे. त्याबाबत त्याने नि.क्र.२ वर पुर्सीस दाखल केली आहे. आरोपी स्वखुशीने गुन्हा कबुल करत असल्याची खात्री केली. आरोपीचा गुन्हा हा पहिलाच असल्यामुळे महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२–अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे, आरोपीस द्रव्य दंडाची व कोर्ट उठेपर्यंत शिक्षा पुरेशी आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

सं.फौ.ख.क्र.337/२०२६
Exh-3

**श्री. पी.के.मुटकुळे न्यायदंडाधीकारी प्रथम वर्ग, कुही, जि.नागपूर.**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | 29.01.2026 |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादचा दिनांक | 29.01.2026 |
| ३ | फिर्यादीचे नांव, त्याच्या आई व वडिलांचे नांव, त्याचे वय व निवासस्थान इ. | पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे कुही, ता.कुही, जि.नागपूर. |
| ४ | आरोपीचे नांव, आरोपीच्या आई व वडिलांचे नावगांव व त्याचे निवासस्थान इ. | महेश शंकर कठोले<br>वय –48– वर्षे, रा. कुही फाटा ता.उमरेड जि.नागपूर. |

५ (अ) ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील –

तुम्ही दिनांक 29.01.26 रोजी 11:00 ते 11:30 वाजताच्या सुमारास मौजे कुही फाटा ता.~~कुही~~ उमरेड जि. नागपूर येथे तुम्ही सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या लोकांकडुन पैसे घेऊन पैशाची बाजी लाऊन जुगार खेळ खेळत असतांना व खेळवितांना मिळुन आलात व त्यायोगे महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२–अ अन्वये शिक्षापात्र असलेला या न्यायालयाच्या दखलक्षेत्रात गुन्हा केला.

आणि म्हणुन मी तुमच्यावर सदरहू आरोप ठेवीत आहे.

(पी. के. मुटकुळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कुही, जि.नागपूर.

दि. १४.०३.२०२६